महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकासाठी विशेष अभय योजना (स्पेशल ॲम्नेस्टी स्कीम)

# महाराष्ट्र शासन

## उद्योग, उर्जा व कामगार विभाग

## शासन निर्णय क्रमांकः एसआयसी २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१०

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

तारीख: २ मे, २०१३.

**वाचा -**

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक आयआयपॉलीसी २०१०/प्र.क्र.७६८/ उद्योग-२, दि. २२/२/२०१३.

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र राज्याचा समतोल औद्योगिक विकास घडविण्यासाठी व त्याद्वारे आर्थिक विकास साधण्यासाठी आणि नवीन उद्योग घटकांच्या स्थापनेस चालना देण्यासाठी व त्याद्वारे रोजगाराच्या भरीव संधी निर्माण होण्यासाठी “महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३” नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष अभय योजना (स्पेशल ॲमनेस्टी स्कीम ) सुरु करण्यात येईल असे जाहीर केले आहे. त्या धोरणानुसार खालील शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

## शासन निर्णय-

पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांची जमीनीसकटची स्थिर मालमत्ता वापरात येणे अत्यंत जरुरीचे आहे. त्यामुळे जे उद्योग घटक खालील निकष पूर्ण करतील. अशा उद्योग घटकांना विशेष अभय योजनेद्वारे सुलभ निर्गमन पर्याय (इझी एक्झिट ऑप्शन ) उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी बंद असलेला किंवा न्यायालयाकडून नादार/ दिवाळखोर (insolvent) म्हणून घोषित झालेला उद्योग घटक.

ब) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूत्रानुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेला उद्योगघटक.

क) घटकाच्या व्यवस्थापनात बदल होऊन घटक पुढे यशस्वीरित्या चालू रहावे.

२. या योजनेअंतर्गत पात्र ठरणा-या घटकाने राज्य शासनाची सर्व मुद्दलाची रक्कम एक रकमी भरल्यास व्याज व दंडव्याज माफ केले जाईल. सदर योजना ही शासनाची सर्व प्रकारची देणी म्हणजेच विक्रीकर, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या थकबाकीची मूळ रक्कम, व्याज व दंडव्याज, इत्यादीसह

जी रक्कम येईल ती सर्व रक्कम थकबाकी समजण्यात यावी. सदर योजना निमशासकीय संस्था, शासकीय कंपन्या व महामंडळे यांच्याकडील थकीत देण्यांसाठी देखील लागू राहील. ही योजना दिनांक ३१.३.२०१४ पर्यन्त सुरु ठेवण्यास शासन मान्यता देत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०५०२१३३८५८०४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Babanrao Kadam

Digitally signed by Kishor Babanrao Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy & Labor, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Kishor Babanrao Kadam
Date: 2013.05.16 15:35:08 -07'00'

( कि. ब. कदम )
उप सचिव.

प्रत,

१. सचिव, वित्त मंत्रालय, (बँकीग विभाग) भारत सरकार, नवी दिल्ली
२. सचिव, उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली
३. गव्हर्नर, रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
६. मा.मंत्री (उद्योग ) यांचे खाजगी सचिव
७. मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
८. मा.मंत्री (सर्व) व मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
९. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१०. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
११. मा. मुख्य सचिव
१२. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव
१३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग / औरंगाबाद विभाग / पुणे विभाग / नाशिक विभाग / अमरावती विभाग / नागपूर विभाग.
१४. विकास आयुक्त (उद्योग), उद्योगसंचालनालय, मुंबई.
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.

१६.सर्व जिल्हाधिकारी
१७.व्यवस्थापकीस संचालक, सिकॉम लि. मुंबई.
१८. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या नियंत्रणाखालील महामंडळे/ शासकीय उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक/ मुख्य कार्यकारी अधिकारी
१९.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
२०.उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील सर्व अधिकारी/ कार्यासने
२१.उद्योग सह संचालक / अधिक्षकीय उद्योग अधिकारी, मुंबई प्राधिकरण विभाग/ कोकण विभाग /पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/ नागपूर.
२२.महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (सर्व)
२३.निवड नस्ती (उद्योग-१० ).